RNI No. MAHBIL /2009/31733

Reg. No. MH/MR/South-322/2013-15

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष ५, अंक ३५(४)] सोमवार, जुलै १, २०१३/आषाढ १०, शके १९३५ [पृष्ठे ८, किंमत : रुपये २५.००

### असाधारण क्रमांक ८०

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २९ जून २०१३.

### अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक-एसएओ०७१२/प्र.क्र.२९५/प्रशा-२.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या नियंत्रणाखालील महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ (प्रशासन शाखा)मधील शिक्षणाधिकारी, या पदाच्या सेवा प्रवेशाचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना शिक्षणाधिकारी, महाराष्ट्र शिक्षण सेवा, मधील गट-अ (प्रशासन शाखा ) ( सेवाप्रवेश ) नियम, २०१३ असे संबोधण्यात यावे.

२. या नियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर,—

(अ) " आयोग " याचा अर्थ महाराष्ट्र लोक सेवा आयोग ;

(ब) " पदवी " याचा अर्थ सांविधीक विद्यापीठाची पदवी ;

(क) " विभाग " याचा अर्थ महाराष्ट्र शासनाचा शालेय शिक्षणव क्रीडा विभाग ;

(ड) " उप शिक्षणाधिकारी " याचा अर्थ महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-ब (प्रशासन शाखा) मधील उप शिक्षणाधिकारी असा असून यामध्ये या नियमासोबत जोडलेल्या अनुसूची " ब " मध्ये नमूद केलेल्या पदांचा समावेश होतो ;

(इ) " शिक्षणाधिकारी " याचा अर्थ महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ (प्रशासन शाखा) मधील शिक्षणाधिकारी असा असून यामध्ये या नियमासोबत जोडलेल्या अनुसूची " अ " मध्ये नमूद केलेल्या शिक्षणाधिकारी व तत्सम पदाचा समावेश होतो ;

(फ) " शासन " याचा अर्थ महाराष्ट्र शासन ;

(ग) " अनुसूची " याचा अर्थ या नियमासोबत जोडलेल्या अनुसूची ;

३. शिक्षणाधिकारी या पदावरील नियुक्ती पुढील मार्गाने करण्यात येईल,—

(अ) उप शिक्षणाधिकारी हे पद धारण करणाऱ्या व या पदावर किमान ३ वर्षे नियमित सेवा पूर्ण केलेल्या योग्य व्यक्तीच्या ज्येष्ठता अधीन निव्वळ गुणवत्ता या निकषावर पदोन्नतीद्वारे ; किंवा

(ब) उप शिक्षणाधिकारी हे पद धारण करणाऱ्या व खालील अटी पूर्ण करणाऱ्या योग्य व्यक्तींमधून, आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या मर्यादित विभागीय परीक्षेच्या निकालाच्या आधारे तयार केलेल्या गुणवत्ता यादीच्या आधारे निवडीने -

(१) ज्यांनी या पदावर किमान ७ वर्षे नियमित सेवा पूर्ण केली आहे ;

(२) ज्यांचे वय ४० वर्षांपेक्षा कमी नाही ; किंवा

(क) पुढील अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे ;

(१) ज्यांचे वय ३३ वर्षांपेक्षा जास्त नाही :

परंतु अगोदरपासून शासकीय सेवेत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत शिथिल करण्यात येईल ;

(२) ज्यांनी सांविधिक विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील प्रथम श्रेणीतील पदवी किंवा शासनाने त्यास समतुल्य म्हणून जाहीर केलेली अन्यकोणतीही अर्हता धारण केली आहे ;

(३) ज्यांना मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आहे, म्हणजेच त्यांना मराठी भाषा अस्खलीतपणे वाचता, लिहिता व बोलता येणे आवश्यक आहे.

४. या पदांवर पदोन्नतीद्वारे, विभागीय मर्यादित परीक्षेद्वारे निवडीने व नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नियुक्त्या ३०:२०:५० या प्रमाणात करण्यात येतील :

परंतु असे की, निवडीने नियुक्तीसाठी योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास आयोगाच्या पूर्व मान्यतेने वरीलप्रमाणे नियुक्तीचे प्रमाण शिथिल करून या कोट्यातील पदे शासनास पदोन्नतीने किंवा नामनिर्देशनाने भरता येतील.

५. या पदावर नामनिर्देशनाने नियुक्त झालेली व्यक्ती २ वर्षांच्या परिविक्षाधीन कालावधीवर राहील. परिविक्षाधीन कालावधी जास्तीत जास्त एक वर्षापर्यंत वाढवता येईल. या पदावर नेमणूक केलेल्या व्यक्तीने, पदासाठी विहित केलेली विभागीय परीक्षा परिविक्षाधीन कालावधीत उत्तीर्ण करणे तसेच परिविक्षाधीन कालावधी यशस्वीरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील. त्याने/तिने परिविक्षाधीन कालावधीत, विहित विभागीय परीक्षा उत्तीर्ण न केल्यास किंवा परिविक्षाधीन कालावधी यशस्वीरित्या पूर्ण न केल्यास किंवा तो/ती त्या पदासाठी पात्र नसल्याचे आढळून आल्यास तो/ती सेवा समाप्त करण्यास पात्र राहील.

६. या पदावर नियुक्त केलेली व्यक्ती या संबंधात तयार करण्यात आलेल्या नियमानुसार विभागीय परीक्षा आणि हिंदी व मराठी भाषा परीक्षा अगोदरच उत्तीर्ण झालेली नसेल किंवा त्याला/तिला परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळालेली नसेल तर, त्याने/तिने सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

७. या पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणी/वापरण्याबाबतचे प्रमाणपत्र धारणकरणे आवश्यक राहील.

८. या पदावर नियुक्त केलेली व्यक्ती, महाराष्ट्र राज्यात कोठेही बदली होण्यास पात्र राहील.

## अनुसूची-अ

शिक्षणाधिकारी व तत्सम पदे

| अ. क्र. (१) | पदनाम (२) |
|---|---|
| १ | शिक्षणाधिकारी (प्राथमिक),सर्व जिल्हा परिषदा |
| २ | शिक्षणाधिकारी (माध्यमिक),सर्व जिल्हा परिषदा |
| ३ | शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण ),सर्व जिल्हे |
| ४ | शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई |
| ५ | सहायक संचालक, शिक्षण संचालनालय (माध्यमिक) पुणे/शिक्षण संचालनालय (अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण) पुणे/, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे |
| ६ | सहायक संचालक, सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, |

| (१) | (२) |
|---|---|
| ७ | सहायक आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे |
| ८ | प्राध्यापक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे/राज्य आंग्ल भाषा संस्था/राज्य विज्ञान संस्था |
| ९ | संपादक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे |
| १० | उप सचिव, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे |
| ११ | सहसचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ व विभागीय शिक्षण मंडळ |
| १२ | प्रकल्प अधिकारी, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे |
| १३ | प्राचार्य, महाराष्ट्र राज्य दृकश्रवण शिक्षण संस्था (बालचित्रवाणी)/शासकीय विद्यानिकेतन |
| १४ | व्यवसाय मार्गदर्शन अधिकारी, व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था, मुंबई व विभागीय कार्यालये |
| १५ | प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ, महानगरपालिका पिंपरी-चिंचवड/कल्याण-डोंबिवली |
| १६ | प्रशिक्षण प्रमुख /समन्वयक/प्रकल्प समन्वयक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद,मुंबई |
| १७ | शिक्षणाधिकारी, शिक्षण मंडळ, महानगरपालिका पुणे/कल्याण-डोंबिवली/ठाणे |
| १८ | संचालक, जवाहर बाल भवन, मुंबई |

## अनुसूची-ब

उप शिक्षणाधिकारी व तत्सम पदे

| अ. क्र. (१) | पदनाम (२) |
|---|---|
| १ | उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक),सर्व जिल्हा परिषदा |
| २ | उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक),सर्व जिल्हा परिषदा |
| ३ | उप शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण),सर्व जिल्हे |
| ४ | शिक्षण उप निरीक्षक, बृहन्मुंबई/सर्व विभागीय उप संचालक कार्यालये |
| ५ | गट शिक्षणाधिकारी, सर्व जिल्हा परिषदेमधील पंचायत समिती |
| ६ | प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ, नगरपालिका सोलापूर/कोल्हापूर/नाशिक/नवी मुंबई/उल्हासनगर |
| ७ | शिक्षणाधिकारी, शिक्षण मंडळ, नगरपालिका/महानगरपालिका कल्याण-डोंबिवली/ठाणे/भिवंडी/औरंगाबाद/वाघाळा-नांदेड/ अकोला |
| ८ | विशेष कार्यकारी अधिकारी/सहायक कार्यक्रम अधिकारी/विषयतज्ज्ञ/उप संपादक/सहायक सचिव/सांख्यिकी अधिकारी/सहायक क्षेत्रीय अधिकारी/महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे |
| ९ | मुख्याध्यापक (राजपत्रित) सर्व शासकीय (जिल्हा परिषद) शाळा |
| १० | प्राचार्य, सर्व शासकीय अध्यापक विद्यालये |
| ११ | अधिव्याख्याता, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे/राज्य आंग्ल भाषा संस्था/राज्य विज्ञान संस्था/महाराष्ट्र राज्य दृकश्रवण संस्था |
| १२ | मूल्यमापन अधिकारी, परीक्षा परिषद/महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद/महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद |
| १३ | सहायक सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ व विभागीय शिक्षण मंडळ |
| १४ | समन्वयक, महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था/प्राथमिक शिक्षण संचालनालय/महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, औरंगाबाद. |

| (१) | (२) |
|---|---|
| १५ | तंत्र सहायक, राज्य विज्ञान शिक्षण संस्था/महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद |
| १६ | शास्त्रसल्लागार, राज्य विज्ञान शिक्षण संस्था/विभागीय शिक्षण उप संचालक कार्यालय |
| १७ | समाज शिक्षणाधिकारी, शिक्षण संचालनालय (अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण ) |
| १८ | सहायक व्यवसाय मार्गदर्शन अधिकारी, व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था, मुंबई व विभागीय कार्यालये |
| १९ | कार्यक्रम अधिकारी, जवाहर बाल भवन /अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण संचालनालय/महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई |
| २० | सहायक निरीक्षक/ध्वनी अभियंता महाराष्ट्र राज्य दृकश्रवण शिक्षण संस्था (बालचित्रवाणी) |
| २१ | सहायक वाणिज्य शाळा निरीक्षक/कार्यक्रम संयोजन अधिकारी, महाराष्ट्र राज्य, परीक्षा परिषद |
| २२ | कुलप्रमुख/वसतिगृह रक्षक शासकीय विद्यानिकेतन. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ज.स.सहारिया,**

शासनाचे अपर मुख्य सचिव.

## SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya Annexe, Mumbai - 400 032, dated-29June, 2013.

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No.SAO-0712/C.R.295/12/Prasha-2.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India and in supersession of all existing rules, orders or instruments made in this behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitment to the post of Education Officer, in the Maharashtra Education Service, Group-A (Administrative Branch) under the School Education and Sports Department of the Government of Maharashtra, namely :-

1. These rules may be called the Education Officer in the Maharashtra Education Service, Group-A(Administrative Branch) (Recruitment) Rules, 2013.

2. In these rules, unless the context requires otherwise ,-

(*a*) "Commission" means the Maharashtra Public Service Commission ;

(*b*) "degree" means a degree of a statutory University ;

(*c*) "Department" means the School Education and Sports Department of the Government of Maharashtra ;

(*d*) "Deputy Education Officer" means the Deputy Education Officer in the Maharashtra Education Service, Group-B and it includes the posts mentioned in Schedule B appended to these Rules ;

(*e*) " Education Officer" means the Education Officer in the Maharashtra Education Service, Group-A and it includes the posts mentioned in Schedule A appended to these Rules ;

(*f*) "Government" means the Government of Maharashtra ;

(*g*) "Schedule" means the Schedules appended to these Rules.

3. Appointment to the post of Education Officer in the Maharashtra Education Service, Group-A(Administrative Branch) shall be made either,-

(*a*) by promotion of a suitable person on the basis of strict selection with due regards to seniority from amongst the persons holding the post of Deputy Education Officer having not less than three years of regular service in that post ; or

(*b*) by selection of a suitable person on the basis of merit list prepared on the basis of limited Departmental Examination to be held by the Commission from amongst the persons holding the post of Deputy Education Officer who fulfills the following conditions,—

(*i*) are not less than 40 years of age ;

(*ii*) have completed minimum seven years of regular service in this post ;

(*c*) by nomination from amongst the following candidates who –

(*i*) are not more than 33 years of age :

Provided that, the upper age limit may be relaxed upto 5 years in respect of the candidates already in the Government services ;

(*ii*) possesses a degree in first class or any other qualification declared by Government to be equivalent thereto ;

(*iii*) have adequate knowledge of Marathi to enable the candidate to speak, read and write the language with fluency.

4. Appointment to the post by promotion,selection through limited Departmental Examination and nomination shall be in the ratio of 30:20:50 :

Provided that, if suitable and eligible candidates for appointment by selection are not available, then such posts can be filled in by promotion or nomination by relaxing the ratio with the approval of the Government.

5. A person appointed to the post by nomination shall be on probation for a period of two years. The probation period may be extended maximum upto one year. A person appointed shall be required to pass the prescribed Departmental Examination and complete the probation period successfully. If he does not pass the Departmental Examination or does not complete the probation period successfully within the prescribed period or is not found suitable for the post, he shall be liable to be terminated from the service.

6. A person appointed to the post shall be required to pass the examinations in Hindi and Marathi languages according to the rules made in that behalf, unless he has already passed,or has been exempted from passing, those examinations.

7. A person appointed to the post shall possess a Certificate in Computer Operation prescribed by the Directorate of Information Technology, Government of Maharashtra, from time to time.

8. A person appointed to the post shall be liable for transfer anywhere in the State of Maharashtra.

SCHEDULE-A

**Education Officer and its equivalent posts**

| Sr.No.<br>(1) | Designation<br>(2) |
|---|---|
| 1 | Education Officer (Primary) of all Zilla Parishads. |
| 2 | Education Officer (Secondary) of all Zilla Parishads. |
| 3 | Education Officers ( Adult Education ) in all Districts. |
| 4 | Educational Inspectors, Bhihan Mumbai. |
| 5 | Assistant Directors in the Directorate of Education/ Maharashtra State Council of Educational Research and Training / Minority and Adult Education. |
| 6 | Assistant Directors of all Regional Offices of the Deputy Directors of Education. |
| 7 | Assistant Commissioner, Maharashtra State Council of Examination. |
| 8 | Professors in Maharashtra State Council of Educational Research and Training / State Institute of English for Maharashtra/State Institute of Science Education. |
| 9 | Editor, Maharashtra State Council of Educational Research and Training. |
| 10 | Deputy Secretary, State Board of Teacher Education. |
| 11 | Joint Secretary, Maharashta State Board of Secondary and Higher Secondary Education and Divisional Boards. |
| 12 | Project Officers, Maharashtra State Council of Educational Research and Training/ Occupational Education Technology/Area E Project. |
| 13 | Principals, Audio Visual Education/Government Public Schools. |
| 14 | Vocational Guidance Officer, Institute of Vocational Guidance and Selection, Mumbai and Regional Offices. |

| (1) | (2) |
|---|---|
| 15 | Administrative Officer, Municipal Corporation. |
| 16 | Training Incharge, Co-ordinator, Project Coordinator, Maharashtra Prathamik Shikshan Parishad. |
| 17 | Education Officer, Kalyan-Dombivali, Pune, Navi Mumbai. |
| 18 | Director, Balbhavan, Mumbai and other equivalent posts in Maharashtra Educational Service 'A" (Administrative Branch). |

SCHEDULE-B

Deputy Education Officerand its equivalent posts

| Sr.No. (1) | Designation (2) |
|---|---|
| 1 | Deputy Education Officer (Primary) of all Zilla Parishads. |
| 2 | Deputy Education Officer (Secondary) of all Zilla Parishads. |
| 3 | Deputy Education Officer (Adult Education) in all Districts. |
| 4 | Deputy Educational Inspectors, Brihan Mumbai and all Regional Deputy Director's Office. |
| 5 | Block Education Officers, Panchayat Samittee's of all Zilla Parishads. |
| 6. | Administrative Officer, Municipal Corporation, Solapur / Kolhapur/ Nashik / Navi Mumbai/Ulhasnagar. |
| 7 | Education Officer, Municipal Corporation, Kalyan- Dombivali/ Thane/ Bhivandi / Aurangabad/ Waghala-Nanded/ Akola. |
| 8 | Special Officer/Assistant Programme Officer/Subject Expert/Deputy Editor/Assistant Secretary/Statistician/Assistant Field Officer, Maharashtra State Council of Educational Research and Training, Pune. |
| 9 | Head Master's, all Ex-Government Secondary School. |
| 10 | Principal, Government D.Ed. Colleges. |
| 11 | Lecturers in Maharashtra State Council of Educational Research and Training /State Institute of English for Maharashtra/State Institute of Science Education/ Maharashtra State Audio Visual Education. |
| 12 | Evaluation Officer, Adult Education/State Council of Education Research and Training / Maharashtra State Council of Examination Pune. |
| 13 | Assistant Secretary, State Board of Teacher Education/ Divisional Boards of Secondary and Higher Secondary Education. |
| 14 | Co-ordinator, State Council of Educational Research and Training /Directorate of Primary Education, Pune/ Maharashtra State Educational Planning and Administration, Aurangabad . |
| 15 | Technical Assistant, State Institute of Science Education, Nagpur/ State Council of Educational Research and Training, Pune. |
| 16 | Science Consultant, State Institute of Science Education, Nagpur/Deputy Director Offices. |
| 17 | Social Education Officer, Minority and Adult Education. |

| (1) | (2) |
|---|---|
| 18 | Assistant Vocational Guidance Officers, Institute of Vocational Guidance and Selection, Mumbai and Regional Offices. |
| 19 | Programme Officers, Balbhavan/Adult Education/Maharashta Prathamik Shikshan Parishad, Mumbai. |
| 20 | Assistant Inspector/Sound Engineer, Audio Visual Education Institute. |
| 21 | Assistant Commercial Inspector/Progamme Organising Officer, Maharashtra State Council of Examination. |
| 22 | Warden/Rector, Government Public School. |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

J. S. SAHARIA,
Additional Chief Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.